# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६१५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२५/०९/२०१६

**१) स्वत: राहत्या घराला आग लावल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २४/०९/०१६ रोजी १७.३० वा. दर. यातील आरोपी हा फिर्यादीचा मुलगा असुन आरोपीने स्वत: राहत असलेल्या घराला आग लावुन घराला ताला लावुन निघुन गेल्याने घरातील सामानाचे ५,०००/—रू. चे नुकसान केल्याने फिर्यादी कोठीराम चिंतामन कृपान वय ५६ वर्ष रा. विवेकानंद कॉलोनी पे. पंप ठाणा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४३६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जनबंदु पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्येशाने आपले अस्तीत्व लपवीतांना दिसुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २४/०९/२०१२ रोजी रात्री ००५० वा. दर. यातील आरोपी हा समाज मंदीर चिचखेडा पुनरवसन चे बाजुला पोलीस जिप गाडी पाहुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्येशाने आपले अस्तीत्व लपवीत असता दिसुन आल्यानंतर लपत छपत अंधाराचा फायदा घेवुन पळुन जात असतांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. डहाके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १२२ ब मपोका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. डहाके मॅडम पो.स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३)रोडवर लोकांच्या जिवीतास व येणा—या जाणा—या वाहतुकीस अळथडा निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—**

**अ)** दिनांक. २४/०९/२०१६ रोजी ११.३० ते १२.०० वा. दर. यातील आरोपी वाहन चालकाने आपले ताब्यातील मारोती व्हॅन ही आम रोडवर लोकांच्या जिवीतास व येणा—या जाणा—या वाहतुकीस अळथडा होईल अशा स्थितीत उभे करून मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कोडवते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**ब)** दिंनाक. २४/०९/२०१६ चे १२.३० वा. दर. यातील आरोपी वाहन चालकाने आपले ताब्यातील ही आमरोडवर लोकांच्या जिवीतास व येणा—या जाणा—या वाहतुकीस अळथडा होईल अशा स्थितीत उभे करून मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बोरकर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. अडयाळ येथे कलम २८३ भादविं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बोरकर पो.स्टे. अडयाळ हे करित आहेत.

**४) दारू पिवुन वाहन चालविल्याने गुन्हा नोंद :—**

दिंनाक. २४/०९/२०१६ चे १७.०० ते १७.३० वा. दर. यातील आरोपीने आपल्या ताब्यातील ट्रक दारू पिवुन दारूचे नशेत चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मसिन व्दारे चेक केले असता दारूचे प्रमान मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. डाहाके यांचे व डॉ. रिपोर्ट वरुन पो. स्टे. पवनी येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डाहाके पो.स्टे. पवनी हे करित आहेत.

५) विहीरीत उडी घेवुन आत्महत्या केली. :–

दिंनाक. २४/०९/२०१६ रोजी ०६०० वा. दर. यातील मृतक मधुकर डोकुजी कोहाड वय ७२ वर्ष रा. मोहाडी याने पोटदुखीचे त्रासाला कंटाळुन स्वत:चे घराचे विहीरीत उडी घेवुन पाण्यात बुडून आत्महत्या केल्याने फिर्यादी तेजराम मधुकर कोहाड वय ४७ वर्ष रा. मोहाडी यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गि–हेपुंजे पो.स्टे. मोहाडी हे करित आहेत.

६) नाल्यात पडल्याने इसमाचा मृत्यु . :–

दिंनाक. २४/०९/२०१६ रोजी ०३.०० वा. दर. यातील मृतक राजविंदर सिंग मुकत्यार सिंग डुलीत वय ४० वर्ष रा. मसाळी ता. बनीगळ, पंजाब हा फिर्यादी सोबत हार्वेस्टर मशिन सोबत घेवुन पंजाब येथुन आले व खंडाळा येथे रात्रीला गोपाल सांस्कृतीक कलामंदीर मध्ये थांबले मृतकच्या डोक्यात फरक पडल्याने झोपेतुन उठुन तो बाहेर गेला व नाल्याजवळ पडुन बेहोश अवस्थेत मिळुन आला व थोडयाच वेळाने मरण पावल्याने फिर्यादी लखविंदर सिंग सरदार रंजीत सिंग देवे वय ३७ वर्ष रा. नंबा जि. पटीयाला, पंजाब यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो.स्टे. साकोली हे करित आहेत.

७) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक २४/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १०१ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०३ केसेस, तिन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व ईतर वाहनांवरती ८९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस अधीकारी
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.